# वसई-विरार शहर महानगरपालिका
## अनधिकृत बांधकाम विभाग

दि.०४/११/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

दिनांक ०३ व ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजी मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार व अति.आयुक्त श्री.आशिष पाटील यांचे निर्देशानुसार व उप-आयुक्त श्री.अजित मुठे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती 'सी' चंदनसार अंतर्गत अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

प्रभाग समिती '**सी**' मधील मौजे विरार सर्व्हे नं.४५, हिस्सा नं.३/१, **आनंदी नगर, विरार पूर्व** येथे १) तळमजला + १ मजला आरसीसी बांधकाम केलेल्या व अंदाजे ७००० चौ.फुट क्षेत्रफळ असलेल्या अनधिकृत इमारतीचे बांधकाम तसेच २) दोन मजली आरसीसी बांधकाम केलेल्या व अंदाजे ५४०० चौ.फुट क्षेत्रफळ असलेल्या अनधिकृत इमारतीचे बांधकाम तसेच ३) तळमजला + ५ मजले इमारतीचे विटांचे बांधकाम व पाचव्या व दुसऱ्या मजल्यावरील कॉलम व स्लॅब चे अनधिकृत बांधकाम प्रभाग समिती 'सी' चंदनसार चे प्र.सहा.आयुक्त श्री. गणेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली व पोकलेन च्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आले. यावेळी श्री.अजित मुठे, उप-आयुक्त अतिक्रमण विभाग, प्र.सहा.आयुक्त श्री. गणेश पाटील, कनिष्ठ अभियंता साहिल सावे, अतिक्रमण विभाग प्रमुख विजय गोतमारे, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान व अतिक्रमण विभागाचा कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.आयुक्त महोदयांनी दिलेल्या निर्देशानुसार संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रात होत असलेल्या अतिक्रमण, अनधिकृत बांधकामांवर नियमित कारवाई सुरु करण्यात आली आहे.

**अनधिकृत बांधकाम विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**